P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

**प्रेसनोट** **दिनांक -२१/०७/२०२२**

# शाळा व महाविदयालय आवारात विनाकारण फिरणारे रोड रोमिओंवर होणार कारवाई

**-: मा.पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांनी सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना दिले आदेश :-**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हददीतील सर्व शाळा व महाविदयालये पुर्ण वेळ सुरु झाले असुन खबरदारीच्या दृष्टीकोनातुन मा. श्री. अंकुश शिंदे, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना आपल्या पोलीस स्टेशनचे हद्दीमधील सर्व शाळा व महाविदयालय आवारात परिणामकारक पेट्रोलिंग करण्याचे आदेश दिले आहेत.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये अनुदानित व विनाअनुदानित शाळा व महाविदयालयांची संख्या मोठया प्रमाणात आहे अशा ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विदयार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणात आहे. शाळा व महाविदयालय सुरु होताना व सुटलेनंतर आवारात विनाकारण फिरणाऱ्या रोड रोमीओंकडून महिला व विदयार्थीनींची छेडछाड होण्याची किंवा काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही त्या अनुशंगाने सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना आपआपले पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व अनुदानित व विनाअनुदानित शाळा व महाविदयालय यांना वेळोवेळी भेटी देवुन परिणामकारक पोलीस गस्त वाढविण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

तरी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व सुजान नागरिकांना याव्दारे आवाहन करण्यात येते की, आपल्या परिसरातील शाळा व महाविदयालय ठिकाणी महिला व विदयार्थीनींशी छेडछाडीचा अनुचित प्रकार आढळुन आल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्ष व जवळील पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. गैरकृत्य करणाऱ्या रोड रोमिओंवर पोलीस विभागाकडुन तात्काळ कारवाई करण्यात येईल.

**महत्वाचे हेल्पलाईन नंबर- ११२**
**नियंत्रण कक्ष फोन नंबर -०२०-२७३५२५००**

**(रावसाहेब जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा,
जनसंपर्क अधिकारी पिंपरी चिंचवड